मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृह, लोणी, ता.राहता, जि.अहमदनगर या वसतीगृहाच्या इमारत बांधकामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः बीसीएच-२०१५/प्र.क्र.११४/बांधकामे
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: २१ नोव्हेंबर, २०१७.

वाचा :-

१) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.बीसीएच-२००५/ प्र.क्र.५५४/ मावक-४, दि.२८/६/२००७.

२) आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्र. सकआ/शिक्षण/ मुलांचे/ प्र.क्र./ १४-१५/ का ५ अ/ १०७४, दिनांक १९/५/२०१५

प्रस्तावना :-

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दि.२८/७/२००७ च्या शासन निर्णयान्वये मागासवर्गीय मुलांमुलींसाठी नवीन १०० शासकीय वसतीगृहे आणि विभागीय स्तरावर मागासवर्गीय मुलांमुलींसाठी १००० विद्यार्थी क्षमतेची नवीन शासकीय वसतीगृहे सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यामध्ये लोणी, ता.राहता, जि.अहमदनगर येथील मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृहास मंजूरी देण्यात आली होती. त्याअनुषंगाने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,अहमदनगर यांनी तयार केलेले व आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय,पुणे यांनी त्यांच्या संदर्भ क्र. २ येथील पत्रान्वये सादर केलेल्या **मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृह, लोणी, ता.राहता, जि.अहमदनगर** या वसतीगृहाच्या इमारत बांधकामाच्या सादर केलेल्या रुपये १०,५९,३५,०००/- (रुपये दहा कोटी एकोणसाठ लक्ष पस्तीस हजार फक्त) इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णयः-

आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांनी **मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृह, लोणी, ता.राहता, जि.अहमदनगर** या वसतीगृहाच्या इमारत बांधकामाच्या रुपये ९,९९,४३,९७९/- (अक्षरी रुपये नऊ कोटी नव्याण्णव लाख त्रेचाळीस हजार नऊशे एकोणऐंशी फक्त) इतक्या रकमेचे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेसाठी शासनाकडे पाठविले आहे. त्यामध्ये काही बाबी सुधारीत करुन/ अंतर्भूत करुन/ वगळून मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.२९/९/२०१७ रोजी झालेल्या बैठकीत **मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृह, लोणी, ता.राहता, जि.अहमदनगर** या वसतीगृहाच्या बांधकामाच्या रु. १०,५९,३५,०००/- (रुपये दहा कोटी एकोणसाठ लक्ष पस्तीस हजार फक्त) इतक्या रकमेच्या ढोबळ अंदाज पत्रकास पुढील अटींच्या अधीन राहून या शासन ज्ञापनान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे:-

१) काम सुरु करण्यापूर्वी नमुना नकाशा, मांडणी नकाशा तसेच विस्तृत नकाशास वास्तुविशारदांकडून तसेच त्यास स्थानिक नगररचना प्राधिकरणाची मंजूरी प्राप्त करुन घ्यावी.

२) काम सुरु करण्यापूर्वी जागेच्या मालकी हक्काबाबतची पूर्तता करुन घ्यावी.

३) ढोबळ स्वरुपात करण्यात आलेल्या तरतूदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक तयार करुन त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मंजूरी घेतल्यानंतरच काम हाती घ्यावे.

४) कामाची व्याप्ती पाहता अंदाजपत्रकावर संबंधित मुख्य अभियंता यांची मंजूरी घेण्यात यावी व मुख्य अभियंता यांचे सांक्षांकन आवश्यक आहे.

५) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्रमांक इएनव्ही-२०१३/ प्र.क्र.१७७/ तां.क.१ दि.१०.१.२०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

६) मुख्य वास्तुशास्त्रज्ञ यांनी मंजूर केलेल्या टाईप प्लॅननुसारच सदर बांधकाम करण्यात येत असल्याचे ते मुख्य अभियंता यांच्याकडून प्रमाणित करण्यात यावे.

२. सदर मागासवर्गीय मुलांच्या वसतीगृहाच्या इमारत बांधकामाच्या सविस्तर अंदाजपत्रकास सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता प्राप्त करुन, विहित नियमानुसार अटी व शर्ती निश्चित करुन ई-निविदा प्रसिध्द करण्याची कार्यवाही कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग अहमदनगर यांनी तात्काळ करावी. ई-निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, ई-निविदा प्रक्रियेची सर्व कागदपत्रे सामाजिक न्याय विभागाकडे (उपभोक्ता विभाग) दायित्व मंजूरीसाठी पाठविण्यात यावीत. सामाजिक न्याय विभागाची अंतिम मान्यता झाल्यानंतरच बांधकामाबाबतची पुढील कार्यवाही करण्यात यावी.

३. **मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृह, लोणी, ता.राहता, जि.अहमदनगर** या वसतीगृहाच्या इमारत बांधकामाच्या सुधारीत अंदाजपत्रकाचा सर्वसाधारण गोषवारा पुढील प्रमाणे आहे:-

GENERAL ABSTRACT FOR BACKWORD BOYS GOVERNMENT HOSTEL, LONI, TAL.RAHATA, DIST. AHMADNAGAR

Sr. No	DESCRIPTION OF ITEMS	A.A. AMOUNT (Amount in Rs.)
1	2	3
१	Cost of Construction	**५,६१,३७,४६०.००**
२	Electrification	
	a) External (६% of cost of building proper)	३३,६८,२४८.००
	b) Internal (५% of cost of building proper)	२८,०६,८७३.००
		६१,७५,१२१.००
३	Water supply and sanitation (५% of cost of building proper)	**२८,०६,८७३.००**

Sr. No	DESCRIPTION OF ITEMS	A.A. AMOUNT (Amount in Rs.)
४	Miscellaneous Items	
	Compond Wall and gate	४९,२१,०००.००
	Internal Road	६०,००,०००.००
	Furniture @ Rs.३०००/sqm	७४,८५,०६०.००
	Parking Arrangement	१२,००,०००.००
	Rain Water Harvesting	५,००,०००.००
	Fire Fighting Arrangements	५,००,०००.००
	Land Development	३,००,०००.००
		२,०९,०६,०६०.००
	Sub Total = १+२+३+४	**८,६०,२५,५१४.००**
	Contingecies (४%)	२२,४५,४९८.००
	Price Escalation (१०%)	८६,०२,५५१.००
	Service Tax	५१,६१,५३१.००
A	Total	**१०,२०,३५,०९४.००**
B	Optional Items	
१	Water, Main Storage and Pump House, Borewell etc	७,००,०००.००
२	Lifts	२५,००,०००.००
३	Solar Energy System	५,००,०००.००
४	External Toilets	२,००,०००.००
	Total	**३९,००,०००.००**
	Total Cost of Project A+B	**१०,५९,३५,०९४.००**
	Say Rs.Lakhs	**१०५९.३५**

४. या वर होणारा खर्च मागणी क्र. एन-४, मुख्य लेखाशिर्ष ४२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्ग यांच्या कल्याणावरील भांडवली खर्च, २७७-शिक्षण, पंचवार्षिक योजनां अंतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना, (०१) (०३) मागासवर्गीय मुलांमुलींसाठी शासकीय वसतीगृह बांधणे (४२२५ ०४८१), ५३-मोठी बांधकामे या लेखाशीर्षाखाली खर्ची घालून तो सन २०१५-१६ या वित्तीय वर्षात करण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीमधून भागविण्यात यावा.

५. प्रस्तुत ज्ञापन दिनांक २१/९/२०१७ रोजी आयोजित करण्यात आलेल्या मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील सचिव समितीच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१७११२२१४५२०७२९२२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anil Kondaji Ahire

Digitally signed by Anil Kondaji Ahire
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Social Justic and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d81b5c910bad5837d7f88ac97a75b312f0e5744e cbdc45b7704dcb27f5d4dfef, cn=Anil Kondaji Ahire
Date: 2017.11.22 14:58:18 +05'30'

(अ.कों.आहिरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) आयुक्त, समाजकल्याण, पुणे
२) उपसचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग (इमारती-२), मंत्रालय, मुंबई-३२.
३) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे
४) अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहमदनगर.
५) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहमदनगर.
६) महालेखापाल महाराष्ट्र १/२ (लेखापरीक्षा / लेखाअनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
७) प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, नाशिक.
८) सहायक आयुक्त, समाजकल्याण, अहमदनगर.
९) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे/अहमदनगर.
१०) निवडनस्ती.